बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक २४ | बुधवार, दि.२२ मे २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# बारावीमध्ये नागपूर विभागात गोंदिया जिल्हा अव्वल

## जिल्ह्यात अर्जुनी मोरगावचा आदेश देशमुख प्रथम





गोंदिया-नागपूर विभागामध्ये सर्वाधिक कॉपीची प्रकरणे आढळणारा गोंदिया जिल्हा ९५.२४ टक्क्यांनी अव्वल ठरला आहे.जिल्ह्यातील ११६ विद्यालयांनी विज्ञान,वाणिज्य व कला शाखेत १०० टक्के निकाल दिला आहे.यामध्ये कला शाखेचे १९,टेक्नीकल१,व्होकेशनल २, वाणिज्य शाखेत ७ तर विज्ञान शाखेचा ८७ विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागलेला आहे.यात जिल्हा परिषद व शासकीय आश्रमशाळांनी निकालाच चांगली भरारी घेतली आहे.

अर्जुनी मोरगाव येथील सरस्वती कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान व कला शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून विज्ञान शाखेतून आदेश शरद देशमुख ९५.५०%(५७३) गुण प्राप्त करीत जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.कु. लीना दुर्योधन मडावी ९३.६७% (५६२) गुणांसह जिल्ह्यातून द्वितीय व मुलींमधून प्रथम ठरली आहे.कला शाखेतून कु. प्रेरणा अशोक दहिवले ९०% (५४०) गुणांसह जिल्ह्यातून द्वितीय आली आहे. आदेश देशमुख हा विद्यार्थी दहावी बोर्डाच्या परीक्षेत सुद्धा शाळेतून प्रथम आला होता हे विशेष.संस्थेच्यावतीने या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करुन अभिनंदन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात यावर्षी १२ वीच्या परिक्षेकरीता १९१४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.त्यापैकी १९०७९ विद्यार्थी परिक्षेला बसले.तर १८१७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून जिल्ह्याची निकालाची टक्केवारी ९५.२४ एवढी आहे.

गोंदिया जिल्ह्यात अर्जुनी मोरगाव तालुक्याचा सर्वाधिक निकाल ९७.८१ टक्के असून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.द्वितीय क्रमांक सडक अर्जुनी तालुक्याने ९६.७९ टक्के निकाल लावून पटकावला आहे.तर तृतीय क्रमांक ९५.३६ टक्के निकाल लावत तिरोडा तालुक्याने पटकावला आहे.सर्वाधिक कमी निकाल गोरेगाव तालुक्याचा ९१.९७ टक्के लागला आहे.

गोंदिया तालुक्यात ६५६७ विद्यार्थी परिक्षेकरीता नोंदणी करण्यात आले होते. त्यापैकी ६५४४ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली असून ६२१९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.गोंदिया तालुक्याचा निकाल ९५.०३ टक्के असून मुलींच्या निकालाची टक्केवारी ९६.२६ आहे.आमगाव तालुक्यात १७४४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली,त्यापैकी १७४० विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली असून १६४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.आमगाव तालुक्याची निकालाची टक्केवारी ९४.७७ टक्के असून तालुक्यात मुलींचे प्रमाण ९६.७० टक्के आहे.अर्जुनी मोरगाव तालुक्यात २४३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली.त्यापैकी २४१२ परिक्षेत सहभागी झाले.तर २३६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून तालुक्याची टक्केवारी ९७.८१ असून मुलींची टक्केवारी ९८.७५टक्के आहे.देवरी तालुक्यात १२३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली.त्यापैकी १२३१ परिक्षेत सहभागी झाले व ११६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.निकालाची तालुक्याची टक्केवारी ९४.८८ असून मुलींचे उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ९७.४७ आहे.

गोरेगाव तालुक्यात १६११ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली,त्यापैकी १६०८ विद्यार्थी परिक्षेला बसले.यातील १४७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून टक्केवारी ९१.९७ एवढी आहे.तर मुलींची टक्केवारी ९६.०६ टक्के आहे.सडक अर्जुनी तालुक्यात १६२९विद्यार्थ्यांनी नोंदणी केली,त्यापैकी १६२४ परिक्षेला बसले.तर १५७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून तालुक्याची टक्केवारी ९६.७९ आहे.तालुक्यात मुलींचे प्रमाण ९७.९७ टक्के आहे.सालेकसा तालुक्यातील १५०२ विद्यार्थीपैकी १४९३ परिक्षेला बसले.त्यापैकी १४११ विद्यार्थी विद्यार्थीनी उत्तीर्ण झाले असून तालुक्याच्या निकाल ९४.५० टक्के आहे.तालुक्यात ९६.१८ टक्के मुलींचे प्रमाण उत्तीर्ण होण्याचे आहे.देवरी तालुक्यातील २४२४ विद्यार्थ्यापैकी २४१८ विद्यार्थी परिक्षेला बसले आणि २३०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.तालुक्याच्या निकाल ९५.३६ टक्के असून मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९८.५० टक्के एवढे आहे.

## जिल्ह्यातील १०० टक्के निकाल देणारे कनिष्ठ महाविद्यालय

**तिरोडा तालुका –**
शहिद मिश्रा जु.कॉलेज(व्होकेशनल) तिरोडा
एस.डी.बी.विद्यालय तिरोडा
अदिती आर्ट ज्यु.कॉलेज नवेगाव खुर्द
आदर्श कनिष्ठ महाविद्यालय गोंडमोहाडी
एस.एन.सायंस ज्यु.कॉलेज सरांडी
सेजगाव ज्यु.कॉलेज सेजगाव
गणेश आटर्स व सायंस ज्यु.कॉलेज गुमाधावडा
जी.ई.एस.ज्युनियर कॉलेज नवेझरी
झेड.पी.कन्या ज्यु.कॉलेज तिरोडा
जिल्हा परिषद ज्यु.कॉलेज परसवाडा
सिध्दार्थ ज्यु.कॉलेज ठाणेगाव
भिवरामजी स्कुल व ज्यु.कॉलेज वडेगाव
सुभाष ज्यु.कॉलेज मुंडीकोटा
मानवता ज्यु,कॉलेज केसलवाडा
गुलाबटोला ज्यु.कॉलेज गुलाबटोला
गिरिजाबाई कन्या विद्यालय तिरोडा
जिल्हा परिषद ज्यु.कॉलेज वडेगाव
सी.जे.पटेल ज्यु.कॉलेज तिरोडा
शहिद मिश्रा ज्यु.कॉलेज तिरोडा

**सालेकसा तालुका–**
जिल्हा परिषद हायस्कुल एण्ड ज्यु.कॉलेज साखरीटोला
नारायणभाऊ उच्च माध्य.विद्यालय लोहारा(आर्ट)
लालसिंग मच्छिरके ज्यु.कॉलेज कावराबांध
स्व.शंकरलाल अग्रवाल विद्यालय सालेकसा
शासकीय उच्च माध्यमिक आश्रमशाला बिजेपार
पंचशील विज्ञान ज्यु.कॉलेज मक्काटोला(आर्ट/सायंस)
शासकीय आश्रम शाळा पुराडा(आर्ट/सायंस)
शासकीय आश्रम शाळा जमाकुडो(आर्ट/सायंस)

**सडक अर्जुनी–**
जिल्हा परिषद हाय.एण्ड ज्यु.कॉलेज सडक अर्जुनी
रविंद्र ज्यु.कॉलेज
श्रीकृष्ण अवधूत आदिवासी उच्च माध्य.आश्रमशाळा कोकणा
जी.ई.एस.आटर्स,कॉमर्स,सायंस कॉलेज सडक अर्जुनी
शासकीय उच्च माध्य.आश्रमशाळा शेंडा(आर्ट/सायंस)
सचिन लंजे कला विज्ञान महाविद्यालय सडक अर्जुनी
एच.टी.कलावाणिज्य विज्ञान महा.सडक अर्जुनी
पार्थ कनिष्ठ महाविद्यालय सडक अर्जुनी
सावित्रीबाई मस्के ज्यु.कॉलेज खोडशिवनी
स्व.बनारसीदास अग्रवाल ज्यु.कॉलेज सडक अर्जुनी(आर्टस)
फ्क्रुलीचंदजी भगत कनिष्ठ महाविद्यालय कोसमतोंडी
आदिवासी विकास हाय.व ज्यु.कॉलेज खजरी(डोंगरगाव)
वसंतराव ज्यु.कॉलेज डोंगरगाव सडक
आर.जे.लोहिया विद्यालय सौंदड

**गोरेगाव तालुका–**मॉडेल सायंस ज्यु.कॉलेज गोरेगाव
किरसान मिशन ज्यु.कॉलेज गोरेगाव
जी.ई.एस.ज्यु.कॉलेज मोहाडी
पी.डी.रहांगडाले.ज्यु.कॉलेज गोरेगाव
एम.आय.पटेल ज्यु.कॉलेज सोनी(आर्टस/सायंस)
रामकृष्ण ज्यु.कॉलेज कुर्हाडी
रविंद्र ज्यु.कॉलेज चोपा

**देवरी तालुका–**
शिवराम विद्यालय तथा क.महाविद्यालय मरामजोब
शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय देवरी
शासकीय उच्च मुलींचे आश्रमशाळा बोरगाव बाजार
शासकीय उच्च आश्रमशाळा कडीकसा
रुक्मीणीदेवी अग्रवाल ज्यु.कॉलेज ककोडी
महात्मा गांधी ज्यु.कॉलेज पालांदूर जमी.(आर्टस)
श्रीराम आर्टस ज्यु.कॉलेज चिचगड

**अर्जुनी मोर तालुका–**
अमित ज्यु.कॉलेज अर्जुनी मोर
प्रगती ज्यु.कॉलेज इळदा(परसटोला)(आर्टस/सायंस)
जी.एम.बी.ज्यु,कॉलेज अर्जुनी मोर
श्री समर्थ आदिवासी उच्च माध्यमिक विद्यालय
नत्थुजी पुस्तोडी अनु.आदि.आश्रमशाळा देवलगाव
विदर्भ विज्ञान क.महाविद्यालय कनेरी केशोरी
नुतन हिंदी हाय.व ज्यु.कॉलेज अर्जुनी मोर
स्वामी विवेकानंद वाणिज्य महा.इटखेडा(वाणिज्य)
जयदुर्गा ज्युनियर कॉलेज गौरनगर
स्व.भगिरथीबाई डोंगरवार ज्यु.कॉलेज नवेगावबांध
उमाबाई संग्रामे कॉलेज नवेगावबांध(आर्टस/सायंस)
मानवता ज्यु कॉलेज बोंडगावदेवी
पी.डी.ज्यु.कॉलेज येरंडी
सरस्वती ज्यु.कॉलेज अर्जुनी मोरगाव(आर्टस/सायंस)
नवदोय आर्टस ज्यु.कॉलेज केशोरी
जिल्हा परिषद ज्यु.कॉलेज नवेगावबांध
एस.नाईक ज्युब.कॉलेज बोळदे करड(आर्टस)
जिल्हा परिषद ज्यु.कॉलेज अर्जुनी मोर(आर्टस /सायंस)

**आमगाव तालुका–**
राजीव गांधी विद्यालय वडद (आर्टस /सायंस)
स्व.राधादेवी शर्मा ज्यु.कॉलेज बोरकन्हार
माऊली कला व विज्ञान महाविद्यालय कातुर्ली
श्री तुकाराम कनिष्ठ महाविद्यालय भोसाा
श्री गजानन महाराज कला क.महाविद्यालय घाटटेमणी
आदर्श ज्यु.कॉलेज आमगाव

**गोंदिया तालुका**
सुदामा ज्यु.कॉलेज आसोली(व्होकेशनल)
शासकीय आटीआय फुलचूरपेठ(टेक्नीकल)
मॉ.शारदा इंटर इंग्लीश स्कुल नागरा
पी.आर. इंग्लीश स्कुल नवरगाव कला
शारदा कॉन्व्हेंट इंग्लीश स्कुल गोंदिया(सायंस/कॉमर्स)
श्री.राधेय ज्यु.कॉलेज गोंदिया
स्वामी टेऊराम आदर्श इंग्लीश स्कुल गोंदिया
एक्युट पब्लीक स्कुल गोंदिया (सायंस/कॉमर्स)
लिटल फ्लावर सायंस ज्यु.कॉलेज गोंदिया
संत कबीर सायंस ज्यु.कॉलेज
साकेत ज्युनियर कॉलेज गोंदिया (सायंस/कॉमर्स)
पराग आर्ट.सायंस ज्यु कॉलेज
स्व.के.डी.भाष्कर ज्यु.कॉलेज डांगोर्ली
फुंडे सायंस ज्यु.कॉलेज फुलचूर
प्रोगेसिव्ह ज्यु.कॉलेज गोंदिया
मनोहरभाई पटेल सैनिक स्कुल गोंदिया
खुशाल कापसे सायंस ज्यु.कॉलेज तांडा
एड.लालचंद विद्यालय दासगाव
महात्मा फुले वाणिज्य,क.महा.काटी(कामर्स/आर्टस)
स्व.के.के.इंगले ज्यु.कॉलेज गोंदिया
युवराजसिंग कला कनिष्ठ महा.चुटिया(सायंस/आर्ट)
स्व.शंकरलाल अग्रवाल विद्यालय बिरसोला काटी
विवेक मंदीर ज्यु.कॉलेज गणेशनगर(सायंस/कॉमर्स)
श्री.संत ज्ञानेश्वर आर्टस ज्यु.कॉलेज दतोरा
राष्ट्रीय ज्युनियर कॉलेज डोंगरगाव
शांताबेन पटेल ज्युनीयर कॉलेज गोंदिया(सायंस/कॉमर्स)
राष्ट्रीय ज्युनियर कॉलेज सतोना
शासकीय आदिवासी आश्रमशाळा मजीतपूर
सुदामा ज्युनियर कॉलेज नागरा(आर्टस)
बी.एन.आदर्श सिंधी विद्यालय गोंदिया(आर्टस)
जी.ई.एस.ज्युनियर कॉलेज दासगाव
जी.ई.एस.ज्युनियर कॉलेज रावणवाडी
सौ.अर्चना पी.कन्या ज्यु.कॉलेज दासगाव(बु.)
जी.ई.एस.आर्टस ज्यु.कॉलेज पांढराबोडी
विमलताई सायंस ज्यु.कॉलेज कटंगीकला
जी.ई.एस.ज्यु.सायंस कॉलेज कामठा
एस.एस.गर्ल्स ज्यु.कॉलेज गोंदिया

# भरडाईसाठी धानाची उचल नाही, ३४ राईस मिलर्सला बजावल्या नोटीस

### सहा राईस मिलर्सनी जमा केली बँक गॅरंटी; पण अद्याप धानाची उचल नाहीच



**गोंदिया:** शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या धानाची भरडाई करुन तांदूळ जमा करण्यासाठी करारनामे करुन भरडाई न करणाऱ्या ३४ राईस मिलर्सला जिल्हाधिकाऱ्यांनी नोटीस बजावित काळ्या यादीत टाकण्याचा इशारा दिला. यानंतर ३४ पैकी ६ राईस मिलर्सनी बँक गारंटी जमा करुन धानाची करण्याची तयारी दर्शविली आहे; पण अद्यापही धानाची उचल केली नसल्याची माहिती आहे.

जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळांतर्गत सहकारी संस्थेच्या धान खरेदी केंद्रांवरुन हमीभावाने धान खरेदी केली जाते. यानंतर खरेदी केलेल्या धानाची भरडाई करुन तांदुळ जमा करण्यासाठी राईस मिलर्ससह करार केला जातो; पण गेल्या सहा महिन्यांपासून राईस मिलर्स आणि शासन यांच्या भरडाई व वाहतुकीचे दर आणि करारनाम्यातील अटी-शर्तीवरुन वाद सुरु आहे.

या वादावर अद्यापही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे फेडरेशन आणि विकास महामंडळाने खरेदी केलेला ४० लाख क्विंटल धान तसाच पडून आहे. बऱ्याच प्रमाणात धान उघड्यावर पडून असल्याने तो खराब होण्याची शक्यता आहे. तर यामुळे रब्बीतील धान खरेदीसुद्धा अडचणीत आली आहे. खरिपातील धानाची भरडाई करण्यासाठी जिल्ह्यातील ३४ राईस मिलर्सने करारनामे केले होते; पण त्यांनी अद्यापही धानाची भरडाईसाठी उचल केली नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या ३४ राईस मिलर्सला काळ्या यादीत टाकण्याची नोटीस बजावली आहे. नोटीस हातात पडताच यापैकी सहा राईस मिलर्सनी बँक गारंटी जमा करुन भरडाईसाठी धानाची उचल करण्याची तयारी दर्शविल्याची माहिती आहे. तर उर्वरित राईस मिलर्ससुद्धा आता तयारीला लागले असल्याची माहिती आहे.

### २९६ राईस मिलर्स करतात करार

**जिल्हा मार्केटिग फेडरेशनतंर्गत खरिपात ४० लाख क्विंटलपर्यंत धान खरेदी केली जाते. त्यानंतर या धानाची भरडाई करण्यासाठी दरवर्षी २९६ राईस मिलर्ससह करार केला जातो. त्यामळे वेळेत धानाची भरडाई करुन रब्बीतील धान खरेदी वेळेत सुरु करण्यास मदत होते. पण यंदा केवळ ३४ राईस मिलर्सनी करार ेले असल्याने खरेदी केलेल्या संपूर्ण धानाची भरडाई कशी होणार, असा प्रश्न आहे.**

### आचारसंहिता संपल्यानंतरच निर्णय

**शासनाने राईस मिलर्सच्या मागण्यांवर तोडगा काढल्यास विलंब केला. त्यातच लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने आता हा निर्णय लांबणीवर पडला. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपेपर्यंत राईस मिलर्सच्या मागण्यांवर तोडगा निघण्याची शक्यता कमी असून, तोपर्यंत यावर निर्णय होण्याची शक्यता कमी आहे.**

# पी.डी.राहांगडाले कनिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



**गोरेगाव–** स्थानिक पी.डी.राहांगडाले कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव येथील वर्ग १२ वीचा एकुण निकाल ९६ टक्के लागला.विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के व कला शाखेचा निकाल ९१.७५ टक्के लागला असून कला विभागात प्रथम कु.अर्पिता जितेंद्र चौहान, द्वितीय ईशाबाई श्रीराम तुरकर, तृतीय दिपक राजेश शर्मा तर विज्ञान विभागात प्रथम तृप्ती ओम प्रकाश बघेले, द्वितीय चेतना होमराज राहांगडाले, तृतीय खोमेश प्रमोद राठोड व पृथ्वीराज भोजराज पटले याने चौथा क्रमांक पटकावला.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव एड. टी.बी.कटरे, अध्यक्ष डॉ. टी.पी.येळे,संचालक यु.टी.बिसेन, प्राचार्य सी.डी. मोरघडे, पर्यवेक्षक ए.एच.कटरे व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांनी केले आहे.

# जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव त्वरित सादर करावे

**गोंदिया :** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात सीईटी, जेईई, नीट यासारख्या प्रवेश पात्रता प्रक्रियेमधून व्यावसायिक अभ्यासक्रमात आरक्षित प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे. इयता १२ वी विज्ञान तसेच पदवी अभ्यासक्रमानंतर बी.ई., बी.टेक., मेडिकल, फार्मसी, आर्किटेक्ट, पशुवैद्यकीय, एमबील, एमसील, विधी, बी.एड. यासारख्या अभ्यासक्रमात प्रवेश घेतांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी याकरीता सीईटी, जेईई, नीट व तत्सम प्रवेश परीक्षा दिल्या असतील तर काहींचे निकालही प्राप्त झालेले असतील, अशा मागासवर्गीय (अनु.जाती, विजाभज, इमाव व विमाप्र) विद्यार्थ्यांनी त्यांचे जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव बार्टी, पुणे च्या संकेतस्थळावर जावून ऑनलाईन पध्दतीने भरावे.

पान ३ वर

# रेल्वेच्या मालवाहतुकीत अदानींचा प्रवेश, नागपूर बोरखेडी येथे "कार्गो टर्मिनल"

**नागपूर :** विविध क्षेत्रात आपले प्रस्थ निर्माण करणाऱ्या अदानी समुहाने आता रेल्वेच्या मालवाहतूक क्षेत्रातही शिरकाव केला आहे. भौगोलिकदृष्ट्या देशाच्या मध्यभागी असलेल्या नागपूर शहराजवळील बोरखेडी येथे अदानी समूहाचे "कार्गो टर्मिनल' विकसित करण्यात येणार आहे. त्याकरिता मध्य रेल्वे आणि अदानी समूह यांच्यात करार झाला आहे.

उद्योगातील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी रेल्वेने "गतीशक्ती मल्टी-मॉडल कार्गो टर्मिनल (जीसीटी)' धोरण आखले आहे. त्यानुसार खासगी कंपन्यांना रेल्वेच्या जागेवर "जीसीटी' विकसित करण्याची मुभा दिली जाते. नागपूर येथे कंटेनर वाहतूक हाताळण्यासाठी "मेसर्स अदानी लॉजिस्टिक लिमिटेड' कार्गो टर्मिनल विकसित करणार आहे.

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने यासंदर्भातील करारावर स्वाक्षरी केली. विभागातील हे चौथे गतीशक्ती कार्गो टर्मिनल (जीसीटी) आहे. यापूर्वी एमपी बिर्ला सिमेंट, मुकुटबन, नागपूर एमएमएलपी, सिंदी आणि जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड, कळमेश्वर असे तीन जीसीटी विकसित करण्यात आले आहेत.

भारतीय रेल्वेने १०० गतीशक्ती टर्मिनल्स विकसित करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. सध्या सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वानुसार वेगवेगळ्या राज्यांत ६० टर्मिनल्स आधीच कार्यरत आहेत आणि उर्वरित ४ मार्च २०२५ पर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. पश्चिम बंगालमध्ये आसनसोल रेल्वे विभागाने देशातील पहिल्या टर्मिनलचे काम सुरू केले होते. "जीसीटी' धोरण भारतीय रेल्वेमध्ये खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्यास मदत करते. त्यामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतात.

बोरखोडीचा कार्गो टर्मिनल याला रेल्वेचे दोन मार्ग उपलब्ध असणार आहे आणि हा टर्मिनल १०० एकर परिसरात असेल. यातून खासगी कंपन्यांच्या मालाची ने-आण केली जाईल. यामुळे रेल्वे तसेच अदानी समुह यांना फायदा तर होईलच शिवाय टर्मिनलच्या माध्यमातून विदर्भ आणि संपूर्ण देशात मालवाहतूक करणे सोयीचे होईल, असा दावा रेल्वे प्रशासनाने केला आहे.



**कंटेनर वाहतूक हाताळण्यासाठी बोरखेडी येथे कार्गो टर्मिनल विकसित करण्याबाबत मध्य रेल्वे आणि अदानी समूहात करार झाला आहे. जीसीटी लॉजिस्टिक व्यवसाय वाढवेल आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देण्यासाठी अधिक महसूल निर्माण करेल. –**
**अमन मित्तल, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, मध्य रेल्वे**
**हे टर्मिनल अद्यायावत झाल्याने कार्यक्षमता वाढेल. येथे मे महिन्यात ३० (रेक) आणि जूनमध्ये ३५ मालगाड्यांची पूर्ण क्षमतेने मालवाहतूक केली जाणे अपेक्षित आहे. तसेच येत्या काही महिन्यांत त्यात आणखी वाढ होईल.**
**निवृत्ती बच्छाव, टर्मिनल प्रमुख, अदानी लॉजिस्टिक, बोरखेडी**

# आंबा लागवडीपासून ते काढणीपर्यंत "कशी" घ्यावी काळजी

## आंबा कार्यशाळेत मार्गदर्शन



**गोंदिया:** फळबाग असो की कोणत्याही हंगामातील पिके, त्याची लागवडीपासूनच योग्य काळजी घेतली तर वनस्पतीची वाढ आणि त्याच बरोबर उत्पादनात देखील वाढ होणार आहे. विशेष: आंबा फळबागांची लागवड करताना महत्वाचे असते ते क्षेत्र. आंब्याच्या एकदा लागवड झाली की, ते अनेक वर्ष उत्पादन देणारे फळपिक आहे. त्यामुळे आंबा लागवडीपासून ते काढणीपर्यंत काळजी कशी घ्यायची यावर सखोल मार्गदर्शन महादेश फार्मचे अध्यक्ष सचिन नलवडे यांनी केले. ते तालुक्यातील मजीतपूर येथे रुची गृप ऑफ कंपनीच्या ओम एग्रो फार्मच्यावतीने आयोजित एकदिवशीय आंबा कार्यशाळेत (दि.१९) रविवारला बोलत होते.

कार्यक्रमाला मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू तसेच भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली शास्त्रज्ञ निवड समितीचे माजी अध्यक्ष सी.डी.मायी, महादेश फार्म पुणेचे अध्यक्ष सचिन नलवडे, रेशीम बोर्डाचे माजी उपसंचालक लक्ष्मीकांत कलंत्री, अकोला कृषी विद्यापीठाचे वनस्पती रोग शास्त्रज्ञ डॉ.सुभाष पोटदुखे, गडचिरोली येथील कषी अधिकारी, रुची गृपचे मार्गदर्शक अध्यक्ष डॉ.एस.एम. ठाकूर, ओम एग्रो फार्मचे भालचंद्र ठाकूर,महेंद्र ठाकूर आदी मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलतांना नलवडे म्हणाले की, ज्या शेतकऱ्यांना नव्याने फ़ळबाग लागवड करायची आहे. त्या शेतकऱ्यांनी पावसाळ्याच्या पहिल्या पावसापासून तयारी करणे गरजेचे आहे. आंबा हे असे फळपिक आहे जे कोणत्याही मातीच्या प्रकरात घेता येते. काळाच्या ओघात आता उत्पादनाकरिता अधिकचा काळ वाट पाहण्याची गरज नाही. याकरिता गरजेचे आहे ते सुधारित वाण. सोबतच कधीकधी फळं झाडावरून अकाली पडू लागतात. हे टाळण्यासाठी युरियाचा २ टक्के द्रावण करून झाडांवर फवारणी करता येते. याकरिता नॅफिलीनदेखील वापरू शकता. प्रथम फळधारणा झाल्यावर जी फवारणी केली जाते त्याच औषधांचा हा फळांवर आणि आंब्याच्या झाडावरही होणार आहे. त्याकरीता पाचप्रकारच्या औषधांची खरेदी एकत्रित करुन अमावस्या व पौर्णिमेच्या दिवशी फवारणी करण्याचा सल्ला दिला. तसेच आंबा पुर्ण परिपक्व होण्याच्या किमान ४५ दिवसापुर्वीच औषधांची फवारणी थांबविण्याबद्दल मार्गदर्शन केले. यासोबतच आंब्याची काढणी करताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. आंब्याची पिकलेली फळे ३ ते ६ मीटर लांब देठांनी काढणी करावीत. यामुळे फळांवर स्टेम रॉड आजाराचा धोका टाळता येतो असे सांगितले.

यावेळी डॉ.सी.डी.मायी यांनी आंबा उत्पादक शेतकरी बांधवानी एकत्र येत समुहगट तयार करुन उत्पादक क्षमता वाढवून स्वतःच निर्यात करण्याकरीता सक्षम होण्याकरीता एकत्रित येणे गरजेचे असल्याचे सांगितले. सर्वांनी एकच पिकाची निवड केल्यास बाजारपेठेत उत्पादित माल विकण्यास चांगली संधी मिळते असेही त्यांनी सांगितले. यावेळी लक्ष्मीकांत कलंत्री यांनी रुची गृपसह ओम एग्रो फार्मच्यावतीने आयोजित आंबा कार्यशाळेचे कौतुक करीत ठाकुर कुटुबियांचे अभिनंदन केले. या आंबा कार्यशाळेला गोंदिया तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.२२ मे २०२४


# नमो महासन्मान योजनेचा चौथा हप्ता निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर




ई-केवायसी पूर्ण झालेले शेतकरी : २ लाख १७ हजार ५२०
ई-केवायसी पूर्ण न झालेले शेतकरी : ११९९
जिल्ह्यातील एकूण शेतकरी : २,१८,७१९

**गोंदिया:-** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेत असलेल्या शेतकऱ्यांना ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. केवायसी करण्याची प्रक्रिया निरंतरपणे सुरू आहे.असे असले तरी अजूनही जिल्ह्यातील ११९९ शेतकऱ्यांनी अजूनही याकडे दुर्लक्ष केले आहे. पीएम किसान योजनेचा १८ वा, राज्य शासनाच्या नमो महासन्मान योजनेचा चौथा हप्ता निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर जून अखेरीस किंवा जुलै महिन्यात मिळणार आहे. दोन्ही हप्त्यांच्या एकूण चार हजारांसाठी शेतकऱ्यांना केवायसी करणे अनिवार्य आहे.

पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना वर्षाकाठी ६ हजार रुपयांचे अनुदान लाभार्थीच्या खात्यात वर्ग केले जाते. त्याच धर्तीवर राज्य शासनानेदेखील नमो महासन्मान योजना सुरू केली. त्यामुळे दोन्ही योजनांच्या मिळून पात्र शेतकऱ्यांना वर्षाकाठी १२ हजार मिळू लागले आ-हेत. यामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे. योजनेचा लाभ खऱ्या आणि पात्र शेतकऱ्यांनाच मिळावा, यासाठी योजनेत समाविष्ट असलेल्या शेतकऱ्यांना ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले.

## कृषी विभागाकडून जनजागृती

**केवायसी आणि आधार सीडिंग न केलेल्या शेतकऱ्यांची गावनिहाय यादी कृषी विभागाकडून यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार तलाठी, कृषी सहायक यांच्यामार्फत संबंधितांना कळविण्यात आले. शिवाय जनजागृती-देखील करण्यात आली. ज्या शेतकऱ्यांनी अजू-नही केवायसी आणि आधार सीडिंग पूर्ण केले नसेल, त्यांनी तत्काळ ही प्रकिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदूराव चव्हाण यांनी केले आहे.**

## आगामी हप्तयापूर्वी प्रक्रिया पूर्ण करा

**पीएम किसान योजनेचा १८ वा आणि नमो महासन्मान योजनेचा चौथा हप्ता जून किंवा जुलै महिन्यात पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केला जाणार आहे. तत्पूर्वी केवायसी आहे. तत्पूवा करण्याची शेतकऱ्यांना संधी आहे. आगामी हप्त्यापूर्वी केवायसी पूर्ण न केल्यास अशा शेतकऱ्यांना दोन्ही हप्त्यांचे मिळून चार हजार रुपये मिळणार नाहीत. स्वतः लाभार्थीना कोणत्याही अॅन्ड्रॉइड मोबाइलवरून ई-केवायसी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.**

### जिल्ह्यातील तालुकानिहाय शेतकरी

| तालुका | शेतकरी संख्या |
|---|---|
| आमगाव | २४१२९ |
| अर्जुनी मोरगाव | २६३०५ |
| देवरी | १७९२२ |
| गोंदिया | ४७७८१ |
| गोरेगाव | २४६९४ |
| सडक अर्जुनी | २४५४९ |
| सालेकसा | १६२७४ |
| तिरोडा | ३७०६३ |

# रस्ता सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करा-जिल्हाधिकारी प्रजित नायर

## रस्ता सुरक्षा समिती सभा



**गोंदिया :** अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने जिल्ह्यातील अपघात प्रवण स्थळांची दुरुस्ती करुन प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित यंत्रणांनी रस्ते सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज रस्ता सुरक्षा समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नरेश लभाने, सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल धोंगडे, मुख्याधिकारी न.प.तिरोडा राहुल परिहार, वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक किशोर पर्वते, मोटार वाहन निरीक्षक सागर पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बी.डी.जायसवाल व संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. नायर म्हणाले, रस्त्यांवर होणाऱ्या अपघातात नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. मानव-ाचा जीव अत्यंत मोलाचा असून रस्त्यांवर होणारे अपघात कमी करण्यासाठी रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने सुक्ष्म नियोजन करण्यात यावे. सध्या जिल्ह्यात ८ अपघात प्रवण स्थळे आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील रस्त्यावर असणाऱ्या अपघात प्रवण स्थळांची संख्या कमी करण्यासाठी वाहतुकीच्या दृष्टीने त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील ज्या-ज्या ठिकाणी अपघात प्रवण स्थळे आहेत त्या ठिकाणचे फोटो घेऊन आतापर्यंत कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यपूर्तता अहवाल त्वरित सादर करावा.

दुचाकीवर ट्रीपलशीट प्रवास करणाऱ्यांवर पोलीस विभागाने योग्य ती कारवाई करावी. रस्त्यांवर दिशादर्शक व माहितीदर्शक फलक लावण्यात यावे. रस्ते अपघात कमी करण्यासाठी वाहनचालकांना वाहतूक नियमांची माहिती असणे गरजेचे आहे, त्यामुळे नागरिकांमध्ये वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जनजागृती करावी. विशेषत: शाळा-महाविद्यालयात शिकणाऱ्या मुला-मुलींमध्ये प्रामुख्याने जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. रस्ता सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस विभाग व परिवहन विभागाने समन्वयातून काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

डुग्गीपार पोलीस स्टेशन अंतर्गत छक-६ नैनपूर, देवरी पोलीस स्टेशन अंतर्गत छक-६ मासुलकसा, तिरोडा पोलीस स्टेशन अंतर्गत NH-७५३ मुंडीकोटा व सहकार नगर, सालेकसा पोलीस स्टेशन अंतर्गत डक-३३५ गॅस गोडाऊन, रामनगर पोलीस स्टेशन अंतर्गत डक-३४९ भागवतटोला शिवार व डक-२७५ कटंगीकला शिवार. अर्जुनी मोरगाव पो-लीस स्टेशन अंतर्गत चडक-११ कुंभीटोला/बाराभाटी. असे एकूण जिल्ह्यात आठ अपघात प्रवण स्थळ आहेत, अशी माहिती यावेळी बैठकीत देण्यात आली.

# संस्थापक-शिक्षकाच्या वादात लिपीकाची हत्या

## डवकी येथील सिद्धार्थ विज्ञान महाविद्यालयातील घटना

**गोंदिया :** इतरांच्या वादात मध्यस्थी करणे किती महागात पडू शकते, हे देवरी तालुक्यातील डवकी येथील सिद्धार्थ विद्यालय तथा महाविद्यालयातील झालेल्या घटनेवरून देवरीकरांना अनुभवास आले. शाळा संस्थापक व शिक्षकाचा सुरू असलेला वाद शमविण्यासाठी मध्यस्थी करून पुढाकार घेणाऱ्या लिपीकाला जीव गमवावा लागला. वादात मध्यस्थी करणाऱ्या लिपीकालाच शिक्षकाने जब्बर मारहाण केली. मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या लिपीकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना गुरूवार १६ मे रोजी उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली. मुकूंद बागडे (६०) रा. मुल्ला ता. देवरी असे मृतकाचे नाव आहे.

सविस्तर असे की, देवरी तालुक्यातील सिद्धार्थ विद्यालय तथा महाविद्यालय डवकी येथे १५ मे रोजी



सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत विविध विषयांवर चर्चा घडवून आणण्यात आली. दरम्यान संस्थेची सभा संपताच शिक्षक हिरालाल खोब्रागडे (५२) यांनी आपल्या समस्या उपस्थित करून संस्थापक अस-लेले मुख्याध्यापक महेंद्र मेश्राम यांना धारेवर धरले. यावरून संस्थापक मेश्राम आणि शिक्षक खोब्रागडे यांच्यात चांगलाच कलगीतुरा रंगला. पाहता पाहता शाब्दीक वाद विकोपाला गेला. तुमच्यामुळे माझ्या आयुष्याची वाट लागली, असा आरोप करीत शिक्षक खोब्रागडे यांनी मुख्याध्यापकांवर हल्लाबोल केला.

दरम्यान मुकूंद बागडे हा समजुत घालण्याच्या उद्देशाने मध्यस्थीसाठी गेला वाद अधिकच वाढत असल्याचे पाहून मुकूंद बागडे हा समजुत घालण्याच्या उद्देशाने मध्यस्थीसाठी गेला. मात्र खोब्रागडे यांनी रागाच्या भरात मुख्याध्यापकांना सोडून मुकुंदलाच जबर मारहाण केली. या घटनेत मुकूंद बागडे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तो जागीच बेशुध्द होवून पडला. बेशुध्द अवस्थेतच मुकुंद बागडे यांना प्रथम उपचारासाठी देवरी ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. नंतर प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी गोंदिया येथील एका खाजगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान आज गुरुवारी १६ मे रोजी पहाटे ३ वाजतादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेची नोंद देवरी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पोलिसांनी गुन्हा नोंद करून आरोपी हिरालाल खोब्रागडे ला अटक केली आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक प्रवीण डांगे करीत आहे.

# गोंदिया-खेडेपार बस फेरी बंद



**सालेकसा :** गोंदिया-खेडेपार बस फेरी बंद करण्यात आल्याने परिसरातील विद्यार्थी व प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. गोंदिया-खेडेपार बस पूर्ववत सुरू करून परिसरातील विद्यार्थी व प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी जिपच्या महिला व बालकल्याण सभापती सविता पुराम यांनी जिल्हाधिकारी, एसटी विभागाचे आगार व्यवस्थापक यांना १४ मे रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

आमगाव मार्गे कावराबांध कोटजभुरा, पवारीटोला, नवेगाव, बाम्हणी, खेडेपार येथे दिवसातून एसटीच्या दोन फेऱ्या सुरू होत्या. त्यामुळे गाव परिसरातील विद्यार्थी, कामगार, मजूर, शेतकरी, छोटे व्यवसायिक यांना आमगाव व गोंदिया येथे शिक्षण व इतर कामानिमित्त जाण्याकरिता सोयीचे होते. परंतु काही महिन्यांपूर्वी गोंदिया-खेडेपार बस फफेरी बंद करण्यात आली. त्यामुळे परिसरातील प्रवाशांसह विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

या मार्गावर इतर दळणवळ-णाची साधने नाहीत. शेतकरी, मजुरांचे आर्थिक व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरिता गोंदिया-खेडेपार एसटीची सेवा पूर्ववत करावी, अशी मागणी सविता पुराम यांनी जिल्हाधिकारी व आ-गार व्यवस्थापकांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

# पिंडकेपार प्रकल्पाची फाइल झाली बंद

**गोंदिया:** मध्यम प्रकल्प म्हणून १९८३ मध्ये मंजुरी मिळालेल्या मध्यम प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले. त्यानंतर सुमारे ५० कोटी रुपये या प्रकल्पावर खर्च करण्यात आले. मात्र एकमागे एक अनेक समस्या निर्माण होत असल्यामुळे राज्य शासनाने या प्रकल्पाची फाइल बंद केली. त्यामुळे कोट्यावधी रुपयांचा चुराडा तर झालाच असून शेतकऱ्यांच्याही स्वप्नांवर पाणी फेरले गेले.



पिंडकेपार मध्यम प्रकल्पाला १९८३ मध्ये मंजुरी देण्यात आली. त्यावेळी या प्रकल्पाची किंमत २.४३ कोटी रुपये आखण्यात आली होती. या प्रकल्पासी डव्वा आणि रापेवाडा येथील शेतकऱ्यांची १५६ हेक्टर जमीन आणि वनविभागाची ३४.७७ हेक्टर जमीन अधिग्रहित करण्यात येणार होती. मात्र प्रकल्पाच्या मंजुरीप-ासून आतापर्यंत लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या कामाला गती मिळाली नाही. उलट विविध समस्या येत होत्या.

प्रकल्पाला ३८ वर्षे पूर्ण झाली असून २००८-०९ मध्ये या प्रकल्पाची किंमत ४० कोटी ६६ लाख रुपयांवर पोह-ोचली. त्याउपरही समस्या संपण्याचे नावच घेत नसल्यामुळे अखेर या प्रकल्पाची फाइलच बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला. लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा कमी पडल्यामुळे ही फाइल बंद करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढावल्यचा आरोप होत आहे.

# "त्या" लाचखोरांना पुन्हा न्यायालयीन कोठडी; जामीन अर्ज फेटाळला



**सडक अर्जुनी:-** नगर पंचायत कार्यालयात बांधकामाच्या कार्यारंभासाठी कंत्राटदाराला निविदा रकमेच्या १५ टक्के लाच मागणाऱ्या मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, बांधकाम सभापती, नगरसेवक, नगरसेविकेचा पती व खाजगी इसम अशा सहा जणांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा कारवाई करीत अडकविले होते. दरम्यान आरोपींना न्यायालयात हजर केले असता १६ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. पोलिस कोठडीनंतर पुन्हा न्यायालयात हजर केले. आरोपींना ३० मे पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. सर्व आरोपींची भंडारा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

सडक अर्जुनी नगर पंचायतीत १४ मे रोजी लाचलुचपत विभागाने सापळा कंत्राटदराकडून १ लाख ८२ हजार रुपयाची लाच मागणाऱ्या मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, बांधकाम सभापती, नगरसेवक, नगरसेविकेचा पती व खाजगी इसम अशा सहा जणांना जाळ्यात अडकविले होते. सर्व आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले असता सहाही आरोपींना १६ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. दरम्यान पोलिस कोठडी संपल्यानंतर आरोपींना पुन्हा न्यायालयात हजर केले. न्यायालयाने ३० मे पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. यामुळे सर्व आरोपींची भंडारा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

लाच घेतल्याप्रकरणी अटकेत असलेले नगराध्यक्ष तेजराम मडावी, प्रभारी मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार शरद हलमारे, बांधकाम सभापती अश्लेश अंबादे, नगरसेवक महेंद्र वंजारी, नगरसेविकाचा पती जुबेर शेख आणि खाजगी इसम शुभम येरणे यांनी पोलिस कोठडी संपल्यानंतर जामिनासाठी अर्ज केला होता. परंतु, न्यायालयाने जामीन अर्ज फ`टाळून लावत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

# धापेवाडा उपसा सिंचन योजनेचे उर्वरीत काम जलदगतीने करा-आ.रहांगडाले



**तिरोडाः-** तालुक्यातील धापेवाडा उपसा सिंचन योजनेचा लाभ शेवटच्या टोकापर्यंतच्या शेतक-ऱ्यांना मिळावा.तसेच या योजनेपासून लाभक्षेत्रातील कोणताही शेतकरी वंचित राहू नये.योजनेचे काम जलदगतीने व्ह-ावे याकरिता विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालय नागपूर येथे १६ मे रोजी आमदार विजय रहांगडाले यांच्या प्रमुख उपस्थितीत विभागप्रमुखांसोबत आढावा बैठक पार पडली.

या बैठकीमध्ये प्रामुख्याने धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा क्र.२ अंतर्गत इंग्रजकालीन बोदलकसा व चोरखमारा वितरण प्रणालीची (कालवा) दुरुस्ती करणे, संग्रामपूर व खळबंदा संपूर्ण कालवे दुरूस्ती वितरण प्रणा-लीची संपुर्ण दुरुस्ती करणे, इत्यादी महत्वपूर्ण सिंचनविषयक विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी प्रामुख्याने प्रकल्प संचालक श्री सोनटक्के, अधीक्षक अभियंता नागपूर पाटपंधारे विभाग मंडळ संजय विश्वकर्मा, उपसा सिंचन प्रकल्प तिरोडा कार्यकारी अभियंता अंकुर कापसे, गोंदिया पाटबंधारे विभाग कार्यकारी अभियंता सोनाली सोनुले, कृषी उत्पन्न बाजार समिति सभापती जितेंद्र रहांगडाले, पं.स.सदस्य अजाबराव रिनाईत, दवनिवाडा मंडळअध्यक्ष धनेंद्र अटरे,माजी उपसभापती रमेश चिल्हारे,कैलास गौतम, सुरेश पटले व विभागांतर्गत सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

# नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना शोधा अनब ११०० रूपये मिळवा



**गोंदिया:** नगर परिषद गोंदिया येथील मुख्याधिकारी सुनिल बल्लाळ हे मागील अडीच महिन्या पासून गोंदिया नगर परिषदेतील त्यांच्या खुर्चीवर बसलेले नाही. २६ फ्रेब्रुवारी २०२४ पासून मुख्याधिकारी नी गोंदिया नगर परिषद येथे पदभार सांभाळला. पण तेंव्हापासून ते नगरपरिषदेची पायरी पण चढले नाही. याचा विरोध म्हणून हरीश तुळसकर (युवासेना गोंदिया जिल्हा अध्यक्ष) यांच्या नेतृत्वात मुख्याधिकारी साहेब यांच्या खुर्चीवर माल्यार्पण करण्यात आले व मुख्याधिकारी यांचा शोध घेणाऱ्यास ११००/- रुपयांचे परितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

गोंदिया नगर परिषदेचे मुख्याधिकारी कधी लोकसभा निवडणुकीच्या नावाखाली तर कधी इतर कारणांनी नगर परिषदेत अनुपस्थित राहतात. त्यामुळे नागरिकांचे कामे होत नाही. पहिल्या टप्प्यातील लोकसभा निवडणूक होऊन १ महिन्याच्या काळ लोटला पण मुख्याधिकारी कार्यालयात दिसत नाही त्यामुळे त्यांच्या खुर्चीला माल्यार्पण करण्यात आले व त्यांना शोधणाऱ्यास ११०० रूपयांचे बक्षिसही युवासेनातर्फे जाहीर करण्यात आले.

२५ मे २०२४ पर्यंत गोंदिया नगर परिषदेत मुख्याधिकारी उपस्थित न झाल्यास त्यांची प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढली जाण-ार, असा इशाराही हरीश तुळसकर यांच्याकडून देण्यात आला आहे.

पान १ वरुन

जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव बार्टी, पुणे च्या संकेतस्थळावर जा-वून ऑनलाईन पध्दतीने भरावे. तसेच त्यासोबत मुळ कागदपत्रे, दाखले, शपथपत्र अपलोड करावे व त्याची हार्ड कॉपी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, गोंदिया येथे सदर प्रवेश प्रक्रियेच्या परीक्षेचे निकालपत्र अथवा प्रवेश पत्रासह तात्काळ दाखल करावे.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी १० ऑगस्ट १९५०, विमुक्त जाती भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांनी २१ नोव्हेंबर १९६१ तसेच इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गच्या विद्यार्थ्यांनी १३ ऑक्टोबर १९६७ च्या पुर्वीचे अथवा त्या तारखेस त्यांचे कुटूंबियांचे जात नोंदीचे तसेच गोंदिया जिल्ह्याचे सर्वसाधारण अधिवासाचे पुरावे संलग्न करणे आवश्यक आहे.

सन २०२३-२४ या सत्रात इयत्ता १२ वीची परीक्षा दिलेल्या विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी सीईटी, जेईई, नीट यासारख्या प्रवेश पात्रता परीक्षेत सहभागी झालेल्या परीक्षेचे प्रवेशपत्र अथवा निकालपत्र यासह प्रस्ताव दाखल करावे.


# ३० मे पर्यंत जिल्ह्याला मिळणार पुस्तके

## १.०६ लाख पुस्तकांची केली नोंद: पहिल्याच दिवशी मिळणार विद्यार्थ्यांना पुस्तक

**गोंदिया:** विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी हातात पुस्तके दिली जावी असे शासनाचे आदेश असतात व त्यानुसार शिक्षण विभागाकडून तयारी केली जाते. मात्र, काही ना काही अडथडे येतात व पहिल्याच दिवशी पुस्तकांपासून विद्यार्थी वंचित राहतात. मात्र, यंदा तसे काही होऊ नये यासी शिक्षण विथागाने कंबर कसली आहे. यंदा शिक्षण विभागाने जिल्ह्यात एक लाख १४ हजार ८२५ विद्यार्थ्यांची नोंद केली असून, त्यांच्यासाठी एक लाख सहा हजार ९०० पुस्तकांची मागणी केली आहे. येत्या ३० तारखेपर्यंत ही पुस्तके जिल्ह्याला मिळणार असल्याची माहिती आहे. यामुळे पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके मिळणार अशी शक्यता दिसून येत आहे.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत दरवर्षी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके दिली जातात. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके मिळावी, यासाठी प्रशासनाचा प्रयत्न असतो. गेल्यावर्षी विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके मिळाली. यंदाही त्याच पद्धतीने शिक्षण विभागाने नियोजन सुरु केले आहे. जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद, नगरपालिका, शासकीय शाळा, खासगी अनुदानित शाळांकरिता एक लाख सहा हजार ९०० पुस्तकांची मागणी करण्यात आली आहे.

यंदा प्रत्येक वर्गाचे चार भागांत पुस्तक असून ते एकत्रित स्वरुपाचे आहे. याशिवाय नोट्स काढण्यासाठी सराव पेज दिले जाणार आहे. मागणी करण्यात आ-लेले पुस्तक येत्या ३० तारखेपर्यंत जिल्ह्याला मिळणार अशी माहिती आहे. असे झाल्यास शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्य हाती पुस्तक लागणार आहे.




### गोंदिया तालुक्याला मिळाली पुस्तके

**शिक्षण विभागाने यंदा एकूण एक लाख सहा हजार ९०० पुस्तकांची मागणी केली असून त्यासाठी तालुकानिहाय संख्या ठरविण्यात आली आहे. यात गोंदिया तालुक्याला मागणीनुसार पुस्तके मिळाल्याची माहिती आहे. म्हणजेच, आता सात तालुक्यात पुस्तके पोहोचलेली नाहीत. मात्र ३० तारखेपर्यंत पुस्तके मिळणार आहेत.**

### शिल्लक पुस्तकांचा होणार वापर

**शिक्षण विभागाने जिल्ह्यात एक लाख १४ हजार ८२५ विद्यार्थ्यांची यंदा इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत नोंद केली आहे. त्यांच्यासाठी एक लाख सहा हजार ९०० पुस्तकांची मागणी करण्यात आली आहे. आकडेवारीवरुन विद्यार्थ्यांसाठी पुस्तके कमी पडणार असे दिसून येते. मात्र, मागील वर्षी काही तालुक्यांकडे पुस्तके शिल्लक होती व आता त्यांचा वापर केला जाणार असल्याने पुस्तकांची कमतरता पडणार नाही.**




### सर्वाधिक विद्यार्थी व पुस्तके गोंदिया तालुक्यात

**शिक्षण विभागाने यंदा एकूण एक लाख १४ हजार ८२५ विद्यार्थ्यांची नोंद घेतली असून त्यांच्यासाठी एक लाख सहा हजार ९०० पुस्तकांची मागणी केली आहे. तालुकानिहाय बघितल्यास यामध्ये सर्वाधिक विद्यार्थी व पुस्तके गोंदिया तालुक्यासाठी लागणार आहेत. गोंदिया तालुक्यात ३१ हजार २२८ विद्यार्थ्यांची नोंद घेण्यात आली असून त्यांच्यासाठी ३१ हजार ८७८ पुस्तके मागविण्यात आली आहेत. तर सर्वात कमी विद्यार्थी सालेकसा तालुक्यात असून, आठ हजार ९०३ विद्यार्थ्यांसाठी १० हजार ४८० पुस्तकांची मागणी करण्यात आली आहे**

# वाहतूक पोलिसांची मोठी कारवाई; ४ महिन्यात २०.३७ लाखाचा दंड वसूल

**गोंदिया :** जिल्ह्यातील वाह-तूक पोलिसांच्या वतीने वाहतूक व्यवस्था सांभाळली जाते. यासाठी वाहन चालक, मालकांना वाहतूक नियम पाळण्याचे वेळोवेळी आ-वाहन पोलिसांकडून केले जात आहे. परंतु, वाहतूक नियमांकडे सातत्याने दुर्लक्ष करून पायमल्ली केली जात आहे. अशा वाहन चालकांना दणका देत वाहतूक पोलिसांनी जानेवारी ते एप्रिल या चार महिन्याच्या कालावधीत ४ हजार ९८५ प्रकरण नोंद करून २० लाख ३७ हजार ४०० रूपयाचा दंड वसूल केला आहे.

रक्षित व सुरळीत वाहतूक व्यवस्था रहावी, यासाठी वाह-तूक नियमावली आहे. परंतु, वाहन धारक वाहतूक नियमांना बगल देत आपल्याच मनमर्जीने वाहन चालवित असतात. यामुळे जिल्ह्यात अपघाताच्या संख्येत वाढ होत आहे. यावर आळा बसावा, यासाठी वाहतूक पोलिस कर्तव्यावर असतात. परंतु, वाहतूक नियम पाळताना वाहन धारक दिसत नाही. तर कारवाई करण्यास पुढाकार घेणाऱ्या पोलिसांना चकवा देत वाहन चालक पसार होतात. असे असले तरी वाहतूक पोलिसांनी कर्तव्यावर दरम्यान जानेवारी ते एप्रिल या चार महिन्याच्या अवधीत वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करीत ४ हजार ९८५ प्रकरणांची नोंद केली आहे.

दरम्यान दंडात्मक कारवाई करीत २० लाख ३७ हजार ४०० रुपयाचा दंड वसूल केला आहे. वाहन धारकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे व सुरक्षित प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### सिग्नल तोडणाऱ्यावर कारवाई

**शहरात वाहतुक कोंडीची समस्या कायमच डोकेदुखीची ठरली आहे. यामध्ये सुधारणा व्हावी, याकरीता जयस्तंभ चौकासह काही ठिकाणी सिग्नल व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली आहे. परंतु, सुसाट वाहन धारकांना सिग्नलवर दोन मिनिटे थांबणेही जड जात आहे. वाहतूक पोलिसांनी अशा सिग्नल तोडणाऱ्या २१७६ वाहन चालकांना दणका देत दंडात्मक कारवाई केली आहे. दरम्यान त्यांच्याकडून १० लाख ८८ हजार रुपयाचा दंड वसूल केला आहे.**

# जंगलातील पाणवटे कोरडे,वन्यप्राण्यांची भटकंती

**गोंदिया:-** जिल्ह्यातील नवेगाव नागझिरा अभयारण्यात विविध प्रजातीचे प्राणी, पक्षी यांचा अधिवास आहे. या अभयारण्यातील पाणवठे कोरडे पडत चालल्याने वन्य प्राण्यांना आता पाण्यासाठी लोकवस्तीकडे धाव घ्यावी लागत आहे.विशेष म्हणजे वनविभाग व वन्यजिव विभागाच्यावतीने कोट्यवधी रुपये खर्च करुन पाणवट ,हातपंप,सौरऊर्जेवरील पंप,वनतळे जंगलात तयार करण्यात आले असले तरी आजच्या घडीला ते पानवटे नादुरुस्तावस्थेत असल्याने तिथे पाणीच साचून राहत नाही.

त्यातच एप्रिल व नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसानंतर सर्वत्र पाणी होते. त्यामुळे अभयारण्यात नैसर्गिक आणि कृत्रिम पानवठ्यांत पाणी उपलब्ध झाल्याने उन्हाळ्यात वन्यप्राण्यांची पाण्याची सोय होईल अशी अपेक्षा होती. मात्र माहितीनुसार यातील अनेक पानवटे हे नादुरुस्त आहेत. जे आहेत त्यांच्यातील पाणी आता आटायला लागले आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांना पिण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. वन विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

भंडारा, गोंदिया जिल्हात विस्तारीत नवेगाव नागझिरा अभयारण्य १५२.८१ चौ. कि. मी. क्षेत्रावर पसरलेले आहे. यात २०० च्या जवळपास पक्षांची नोंद आहे. अभयारण्यात वाघासह बिबट, रानकुत्रा, लांडगा, अस्वल, रानगवा, रानडुक्कर, चौशिंगा, नीलगाय, चितळ, सांबर, काकर, रानमांजर, ऊदमांजर, ताडमांजर, उडणखार, सर्प गरुड, मत्स्य गरुड, टकाचोर, खाटीक, राखी धनेश, नवरंग, कोतवाल इत्यादी अनेक प्राणी व पक्षांच्या समावेश आहे. शिवाय औषधीय वनस्पती, विपुल वनसंपदेचा अधिवास आहे. मात्र सध्या जंगलातील पाणी संपत



असल्याने वन्य प्राण्यांना पाण्याच्या शोधात इतरत्र भटकंती करावी लागत आहे.

बहुतांश पानवटे कोरडे पडल्याचे चित्र आहे. काही पाणवट्यामधील पाणी कमी झाल्याने प्राण्यांना पाणी पिणे शक्य नाही. वास्तविक जानेवारी फ़ब्रुवारी महिन्यापासूनच जंगलातील पाण्याचे स्तोत्र कमी होण्यास सुरुवात होते. मात्र यंदा अवकाळी पाऊस सातत्याने हजेरी लावत आहे. यामुळे जंगलातील पानवठे व नाल्यांना पाझर फ़ुटले आहे तसेच सर्वत्र हिरवळ दिसून येत आहे. पाणी उपलब्ध झाले आहे. मात्र हे पाणी किती काळ टिकणार याची शाश्वती नाही.

दहेगाव-अर्जुनी क्षेत्रातील तिडका/करड वनातील अनेक पानवठे कोरडे पडले आहेत. येथे सौरऊर्जेवर चालणारे बोरही बंद पडले आहे. येथील वनतलावात थेंबभरही पाणी नाही. परिसरातील वन्यप्राणी पाण्यासाठी सैरावैरा भटकत आहेत.

गत गतकाळात वन्य प्राण्यांची तहान भागवण्यासाठी येथील वनक्षेत्रात शेकडो कृत्रिम पानवटे निर्माण करण्यात आले होते. जुन्या पानवठ्यांपैकी अनेक पाणवठे नादुरुस्त आहे. त्यामधील प्लास्टिक फाटले, काहींना भेगा पडल्या आहेत त्यांची तत्काळ दुरुस्ती करण्याची गरज आहे.

नवेगाव नागझिरा अभयारण्यात विविध प्रजातीच्या प्राण्यांचा अधिवास आहे. वाघ, बिबट, अस्वल, रानडुक्कर, तडस, कोल्हा, लांडगा, नीलगाय, हरण, मोर, ससे, अजगर यासह विविध प्रजातीचे पक्षी येथे आढळतात. प्राण्यांची मोठी संख्या पाहता अभयारण्यात त्यांच्यासाठी पाण्याची सोय करणे आवश्यक आहे. याशिवाय कृत्रिम पानवट्यामध्ये टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्याचे काम करण्यात येत असल्याचे वन विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

# ऑगस्ट व सप्टेंबर २०२३ या काळातील ३ तालुक्यांचा खत गेला कुठे?

**कृषी केंद्र संचालकांना अधिकाऱ्यांकडून कारवाईची धमकी, कृषी केंद्र संचालकांत भितीचे वातावरण**

**गोंदिया :-** शेतकऱ्यांना रासायनिक खताच्या किंमत वाढीचा अधीभार होऊ नये, या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाकडून खताच्या बॅगवर थेट सवलत देण्यात येते. या सवलत योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हक्काचे रासायनिक खतावर डल्ला मारून कृषी विभाग, खत कंपन्या व घाऊक विक्रेते लिकिंगच्या माध्यमातून मोठा घोळ करीत आहेत. हा प्रकार गोंदिया जिल्ह्यातील काही कृषी केंद्र संचालकांनी चव्हाट्यावर आणला. ऑगस्ट व सप्टेंबर २०२३ या काळात जिल्ह्यात पुरवठा झालेला युरीया खत सालेकसा, गोरेगाव व सडक अर्जुनी या तीन तालुक्यातील अनेक केंद्र संचालकांना पुरवठा करण्यात आलाच नाही, त्यामुळे तो खत गेला कुठे? असा प्रश्ननिर्माण झाला.

मात्र प्राप्त झालेला साठा व विक्री करण्यात आलेला खत यांचा ताळमेळ बसतांना दिसून येत नाही, कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची चांगलीच तडफड सुरू झाली आहे. थेट कृषी विभागाची माहिती प्रसार माध्यमांपर्यंत काही कृषी संचालक पोहचवित आहेत, असा संशय करीत गोरेगाव तालुक्यातील कृषी केंद्र संचालकांवर कारवाईच्या माध्यमातून दबाव तंत्राचा प्रयोग सुरू केला आहे केंद्र बंद का, नियम व अटी-शर्तीवर बोट ठेवून केंद्रातील तुरळक त्रुट्या समोर करून केंद्र संचालकांना त्रास देण्याचा प्रकार कृषी विभागाकडून सुरू करण्यात आला आहे. कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सुरू करण्यात आलेला हा दबाव तंत्राचा प्रयोग आणि खताचे ताळमेळ बसविण्यासाठी सुरू असलेला चुकीचा गणित आणखी संशयाला बळ देत आहे. विशेष म्हणजे या प्रकारावरून कोट्यावधीचा सवलत निधी गळप केला



### स्थानांतरणानंतरही "तो' अधिकारी दडी मारून का ?

**गोंदिया जिल्हा परिषदेच्या कृषी विभागात कार्यरत एका अधिकाऱ्याचे सालेकसा येथे सहा. खंडविकास अधिकारी म्हणून स्थानांतरण झाले. या बाबीला ३ महिन्याचा काळ लोटत चालला असला तरी अद्यापपर्यंत तो अधिकारी गोंदियाच्या कृषी विभागातून बाहेर पडला नाही. उलट मोठ्या पदावर आरुढ आहे. सद्या खत वाटपाचा घोळ चांगलाच चर्चेत असल्यामुळे त्या अधिकाऱ्याचीही चर्चा गरम झाली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी एम. मुरुगानंथमहे या प्रकाराची दखल घेवून त्या अधिकाऱ्याला गोंदिया कृषी विभागातून कार्यमुक्त करणार का? याकडेही लक्ष लागले आहे.**

# स्पीडगनचा ७०२ वाहनांवर निशाणा, पावणेतीन लाखांचा दंड केला वसूल!

**महामार्गावर वाहनचालकांकडून नेहमीच होते वेगमर्यादेचे उल्लघंन**




**गोंदिया:** जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य मार्गावर सुसाट वाहन हाकणाऱ्या ७०२ वाहनांना उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या एकट्या स्पीडगनने वेग मर्यादेचे उल्लघंन करताना टिपले आहे. त्या वाहन चालकांकडून १६ महिन्यांत दोन लाख ७६ हजारांचा दंडदेखील वसूल करण्यात आला आहे.

राज्य किंवा राष्ट्रीय महामार्गावर वेगमर्यादेचे नियम डावलून वाहने धावत आहेत. त्यामुळे वाहनांवरील ताबा सुटून अपघात वाहनांवरील घटनाही वाढल्या आहेत.

या महामार्गावरुन दररोज हजारो वाहने धावतात. वाहनांच्या वेगावर बंधन असावे. यासाठी महामार्ग पोलिसांकडून स्पीडगन व्हॅनच्या माध्यमातून कारवाई केली जाते. यामध्ये जर महामार्गावरील वाहन अे मर्यादेपेक्षा जास्त वेगाने धावत असेल तर, स्पीडगनद्वारे त्या वाहनांचा नंबर व गती नोंद केली जाते. तसेच ऑनलाईन संबंधित वाहनधारकावर दंडात्मक कारवाई केली जाते. यामुळे महामार्गावर स्पीडगन दिसताच अनेक वाहनांची वेगमर्यादा कमी होते.

उपप्रादेशिक कार्यालयाामार्फत एकच स्पीडगन होती. त्या स्पीडगनने जानेवारी २०२३ ते एप्रिल २०२४ या १६ महिन्यांत ७०२ वाहनांनी वेगमर्यादेचे उल्लघंन केल्याचे नमूद केले आहे.

### आणखी तीन वाहनांत स्पीडगन

**उपप्रादेशिक परिवहन विभागात फक्त एकच स्पीडगन होती. मात्र, आता आलेल्या नवीन तीन वाहनांत स्पीडगन बसविण्यात आली आहे. यानंतर आजघडीला येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे स्पीडगन असलेली चार वाहने झाली आहेत. त्या मशीनद्वारे वाहनांची वेगमर्यादा ऑटोमॅटिक कॅच केली जाते. त्या मशीनद्वारे वाहनांचा फोटो काढलाजातो. या फोटोमध्ये वाहनावरील नंबर प्लेट स्कॅन केली जाते व वाहनांवर ऑनलाइन दंड ठोठावला जातो.**

### ऑनलाइन केला जातो दोन हजारांचा दंड

**वरिष्ठांच्या आदेशानुसार आणि मार्गदर्शनात महामार्गावरील भरधाव वेगातील वाहनांवर स्पीडगनच्या मदतीने वाहनांचा वेग रोखला जातो. जे ओव्हर स्पीडने वाहने चालवतात त्यांना ऑनलाइन दोन हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात येतो.**

### एक किमीवरुन वाहनांचा मोजला जातो वेग

**महामार्गावर अतिवेगात असलेल्या वाहनांचा वेग एक किलोमीटर अंतरापर्यंत मोजला जातो. वेगमर्यादा ओलांडली असेल तर स्पीडगनद्वारे त्या वाहनांचे व्हिडीओ आणि फोटो संपादित केले जातात. त्यानंतर ऑनलाइन चालान होते व आरसी नंबरवरुन तो दंड आकारला जातो. दरम्यान, ही दंडाची रक्कम १५ दिवसात भरण्यासंदर्भात संबंधिताला संदेश पाठवला जातो.**

# टेकाटोला दंडारी येथील साठवण बंधाऱ्याचे, प्रत्यक्ष बांधकाम सुरु झालेले नाही

**गोंदिया :** सालेकसा तालुक्यातील टेकाटोला दंडारी येथे मृद व जलसंधारण (लोकल सेक्टर) उपविभाग, सालेकसा यांचे नियंत्रणाखाली गेटेड साठवण बंधाऱ्याचे नविन बांधकाम मंजूर असून सद्यस्थितीत खोदकाम सुरु आहे, कोणत्याही प्रकारचे बांधकामास सुरुवात केलेली नाही. सदर बांधकामासाठी योग्य गुणवत्तेची रेती, सिमेंट (एसीसी ५३ ग्रेड), लोखंड इत्यादी साहित्य सामुग्रीचा साठा करण्यात आलेला आहे. बांधकामाला सुरुवात होणार असून प्रत्यक्ष बांधकाम सुरु झालेले नाही. मृद व जलसंधारण विभागाकडून कामावर नियमितपणे देखरेख सुरु आहे.

जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कामावर भेट देऊन सदर बंधाऱ्याचे बांधकामात योग्य गुणवत्ता राखण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर साठवण बंधाऱ्याचे योग्य साहित्याचा वापर करुन गुणवत्तापूर्ण बांधकाम केले जाईल. अशी माहिती उपविभागीय जलसंधारण अधिकारी पी.डी.मडावी, मृद व जलसंधारण उपविभाग सालेकसा यांनी दिली आहे.

# जननी सुरक्षेचा निधी मुरतोय कुठे?

**गोंदिया:** सुरक्षित प्रसुती आणि गर्भवती मातांच्या सुरक्षेसाठी जननी सुरक्षा कार्यक्रम राबविला जाता आहे. यासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी देण्यात येतो. यातून सुरक्षित प्रसुतीच्या दृष्टीने जे काही लागेल, ते मोफत देण्यात येते. मात्रबाई गंगाबाई रुग्णालयात औषधांपासून सिझेरिअन शस्त्रक्रिया करावयाची झाल्यास त्यासाठी लागणारे साहित्यदेखील रुग्णांनाच बाहेरुन खरेदी करुन आणावे लागते. त्यामुळे या योजनेसाठी येणारा कोट्यावधी रुपयांचा निधी नेमका जातो कुठे? असा प्रश्न निर्माण होत आहे.

गर्भवती मातांची प्रसुती आणि बाळ एक महिन्याचे होईपर्यंत माता आणि बालकांच्या सुरक्षेसाठी कोणताही खर्च लागू नये, यासाठी शासनाच्यावतीने माता-बालक सुरक्षा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत माता आणि बालकांची सुरक्षा मोफत करण्यात येते. आवश्यकता पडल्यास मातांची प्रसुती शासकीय रुग्णालयात कोणत्याही खर्चाविना करण्यात येते. शस्त्रक्रिया आणि त्यासाठी लागणारे साहित्यही शासनाकडून पुरविण्यात येते. गर्भवती महिलांना मोफत औषधीदेखील पुरविण्यात येतात. यात आयरन, फॉलिक अशा सप्लिमेंट औषधांचाही समावेश आहे. गर्भवती मातांची रक्त, लघवी तपासणी, गरज पडल्यास अल्ट्रा सोनोग्राफीसह लागणाऱ्या इतर चाचण्याही मोफत करुन देण्यासह सामान्य प्रसुती झाल्यास तीन दिवस आणि सिझेरियन प्रसुती झाल्यास सात दिवसांपर्यंत मोफत जेवणाचा समावेश आहे. प्रसुतीनंतर ३० दिवसांपर्यंत माता आणि नवजात बाळाला लागणारा सर्व औषधोपचार मोफत देण्यात येतो. मात्र बाई गंगाबाई रुग्णालयात औषधे उपलब्ध नसल्याचे कारण हे नित्याचेच झाले आहे. सिझेरियन प्रसुतीकरिता देखील येथे काही दलाल सक्रिय असून त्यांच्यामार्फत शस्त्रक्रियेसाठी दोन हजार रुपये घेतले जातात तसेच औषधीही बाहेरुन खरेदी करण्याचा सल्ला दिला जातो.

एकीकडे शासन माता-बालक सुरक्षा कार्यक्रमांतर्गत कोट्यावधी रुपयांचा निधी देत असताना मग तो निधी नेमका जातो कुठे? असा प्रश्न आहे. याकडे कायम दुर्लक्ष करण्यात येत आहे. या प्रकाराची उच्चस्तरीय तपासणी झाल्यास मोठा घोळ समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.




### रक्ताची मारामार कायमचीच

**बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयात रक्ताची मारमार हा विषय नेहमीचाच झाला आहे. गर्भवती मातांना प्रसुतीदरम्यान रक्ताचा पुरवठा नि:शुल्क आणि विना परतावा तत्वावर करण्याचा नियम आहे. मात्र बाई गंगाबाई रुग्णालयात रिप्लेसमेंटशिवाय रक्त दिले जात नाही. त्यासाठीही पैसे मोजावे लागतात. परिणामी रुग्णांचे नातेवाइक बाहेरील रक्तपेढ्यांमधून एक पिशवीसाठी दोन हजार रुपये मोजून रक्त आणतात.**

# विरोधकांच्या भ्रामक,खोट्या प्रचाराला बळी पडू नका-माजी आमदार अग्रवाल



**गोंदिया**-विरोधकांच्या भ्रामक गोष्टी, खोट्या प्रचाराला बळी न पडता आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रत्येक घरी जाऊन केंद्र व राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांची व भविष्यातील योजनांची माहिती द्या, असे कार्यकर्त्यांना आवाहन माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी केले.ते शहरात झालेल्या गोंदिया विधानसभा क्षेत्र भाजप पदाधिकारी, कायकर्त्यांच्या सभेत बोलत होते.

सभेला तालुका भाजपा अध्यक्ष धनलाल ठाकरे, शहर अध्यक्ष अमित झा, भाजपा महिला मोर्चा प्रदेश सदस्य भावना कदम, धर्मिष्ठा सेंगर, शहर भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा निर्मला मिश्रा, जिल्हा भाजपा उपाध्यक्ष अशोक चौधरी, तालुका भाजपा महामंत्री अर्जुन नागपुरे, भाजपा दलित मोर्चा माजी अध्यक्ष रतन वासनिक, जि.प.सदस्य विजय उके, भाऊलाल तरोणे, कुणाल बिसेन, विनोद बिसेन आदी उपस्थित होते. अग्रवाल पुढे म्हणले, भाजपच्या आघाडीमुळे विरोधक हतबल झाले आहेत, विरोधकांकडे आता दिशाभूल करणारा प्रचार हाच पर्याय उरला आहे. गत अनेक वर्षापासून कामठा येथे आयोजित सर्वधर्मीय सामुहिक विवाह सोहळ्यात सर्वपक्षीय आजिमाजी लोकप्रतिनिधींसह सर्वच पक्षातील प्रमुख नेते मंडळींना आमंत्रित करण्यात यंदाही अनेक नेत्यांना पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते, मात्र काही लोक या गैश्रराजकीय सोहळ्याचा भ्रामक प्रचारासाठी वापर करीत असल्याचे ते म्हणाले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्ष तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार आहे. स्थानिक उमेदवार किंवा भ्रामक प्रचार करून सर्वसामान्य नागरिकांची दिशाभूल करणे आता शक्य नाही. गोंदिया विधानसभा क्षेत्रात कमळ फ़ुलवण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश केल्याचेही अग्रवाल म्हणाले. येत्या विधानसभा निवडणुकीत भाजपने संधी दिल्यास गोंदिया विधानसभेत निश्चितपणे कमळ फ़ुलणार असल्याचा आशावादही त्यांनी व्यक्त केला.सभेला क्रांती जैस्वाल, शंभूशरणसिंह ठाकूर, खलील पठाण, डॉ. शालिनी डोंगरे, मनोज पटनायक, अंकित जैन, नरेंद्र हलानी, चिंतामण चौधरी, ॲड. पूजा तिवारी, बाबा बिसेन, प्रतीक मिश्रा यांच्यासह दतर पदाधिकारी, कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# देवबोडी तलावात हजारो मासे मृत्यूमुखी

**गोंदिया :** शहरातील छोटा गोंदिया परिसरातील विठ्ठल रुक्माई मंदिराजवळील देवबोडी तलावात हजारो मासे मृत्यूमुखी पडल्याची घटना (दि. १८) उघडकीस आली. परिसरात दुर्गंधी पसरल्याने हा प्रकार नागरिकांच्या लक्षात आला असून दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले आहे. दरम्यान, एवढ्या मोठ्याप्रमाणात माशांचा मृत्यू उष्णतेमुळे की दूषित पाण्यामुळे यावर परिसरात चर्चा रंगली आहे.

शहरातील छोटा गोंदिया परिसरात विठ्ठल रुक्माई मंदिर जवळ जुने देवबोळी तलाव असून तलावात सर्वत्र पानवेली पसरलेली आहे. असे असतानाच गोंदिया शहरातील सांडपाणी देखील या तलावात सोडण्यात येत असल्याचे येथील नागरिकांचे म्हणने आहे. तर त्यामुळेच या तलावातील संपूर्ण पाणी दूषित झाल्याचे सांगण्यात आले. येथील नागरिकांच्या मते दूषित पाण्यामुळे त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. याची तक्रार अनेक वेळा स्थानिक नगर परिषद व जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली आहे. मात्र, प्रशासनाने याकडे लक्ष दिले नाही. त्यातच आज, तलावातून मोठ्याप्रमाणात दुर्गंधी सुटल्याने स्थानिकांनी तलावाची पाहणी केली असता शेकडो मासोळ्या मृतावस्थेत आढळून आल्या.

विशेष म्हणजे, या मृत माशांना दुर्गंधी सुटल्याने नागरिकांना दुर्गंधीमुळे राहणे कठीण झाले आहे. दरम्यान, तलावाची स्वच्छता करण्याची मागणी येथील नागरिकांनी केली असतानाच २४ तासात प्रशासनाने यावर उपाययोजना न केल्यास उपोषण करण्याचा इशाराही दिला आहे.

### नेमके कारण काय?:

**स्थानिकांच्या मते दरवर्षीच उन्हाळ्यात या तलावातील शेकडो माशांचा मृत्यू होतो. तेव्हा माशांचा मृत्यू नेमका दूषित पाण्यामुळे की उष्णतेमुळे नेमके कारण काय? या विषयी परिसरात चर्चा रंगल्या आहे.**



# मुंबईतील घटनेनंतरही नगर परिषद बोध घेईना!

**गोंदिया:** मुंबईतील घाटकोपर परिसरात होर्डिंग कोसळून १४ जणांचा बळी गेला. यानंतर शासन आणि प्रशासनाचे लक्ष या अवैध होर्डिंग, बॅनरकडे गेले. अवैध होर्डिंग, बॅनर लावणाऱ्यांवर कारवाईचे सत्र सुरु झाले. पण गोंदिया शहरात मात्र कुठलीच कारवाई झाली नाही. शहरातील मुख्य चौक, थोर पुरुषांच्या पुतळ्याचे अवैध होर्डिग्ज, बॅनरमुळे विद्रुपीकरण झाले आहे; पण अवैध होर्डिंग व बॅनर लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची हिम्मत नगर परिषदेचे अधिकारी करीत नाहीत. कारण लावलेले होर्डिंग व बॅनर कुठल्या तरी राजकीय पक्षांच्या नेत्यांचे अथवा पदाधिकाऱ्यांचे आहे. तर काही व्यावसायीकांनी यासाठी हप्ते बांधले आहेत. त्यामुळे कारवाई करणार कोण असा प्रश्न कायम आहे.




मुंबईच्या घाटकोपर येथील घटनेनंतर राज्य शासनाने खळबज़ून जागे होत अवैध होर्डिंगबाबत कडक धोरण राबविण्याचे निर्देश यंत्रणेला दिले. काही ठिकाणी लगेच अवैध होर्डिंग बॅनर काढण्यात आले; पण गोंदियात मात्र शेकडो होर्डिंग बॅनर लावलेले असताना त्यांच्यावर मात्र कुणीच कारवाई केली नाही. त्यामुळे मुंबईतील घटनेनंतरही नगर परिषदेने कुठलाच बोध घेतला नसल्याचे चित्र आहे. गोंदिया शहरातील जयस्तंभ चौक, नेहरु चौक, गांधी प्रतिमा, पाल चौक, कुडवा नाका या परिसरात शेकडो अवैध होर्डिग आणि बॅनर लागले आहे. यात राजकीय पक्षांच्या आणि व्यावसायीक बॅनर, होर्डिंगचा अधिक समावेश आहे.

हे होर्डिंग बॅनर लावताना थोर पुरुषांच्या पुतळ्यांचा सुद्धा अवमान केला जात आहे. शहरात कुठेही होर्डिंग, बॅनर लावण्यासाठी नगर परिषदेकडून शुल्क भरुन परवानगी घ्यावी लागते. यातून नगर परिषदेला सुद्धा वर्षाकाठी लाखो रुपयांचे उत्पन्न प्राप्त होते. पण काही जण परवानगी घेण्यासाठी पालिकेत जातात तेव्हा या विभागाचे कर्मचारीच कशाला परवानगी घेता बाहेर काय ते पाहून घेऊन असा सल्ला देतात. त्यामुळे कुणीच परवानगी घेण्याच्या भानगडीत पडत नाही. तर कर्मचाऱ्यांना चिरिमिरी देऊन मोकळे होतात. गोंदिया शहरात सध्या एका शिकवणी वर्ग घेणाऱ्याने मोघ्या प्रमाणात होर्डिंग व बॅनर लावले आहेत.

शेकडो बॅनर आणि होर्डिंग लावले असले तरी परवानगी केवळा दहा ते वीस बॅनरची घेतली असल्याची माहिती आहे. यामुळे नगर परिषदेचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. पण याकडे कुणाचेच लक्ष नाही. त्यामुळे शहरात होर्डिंग आाणि बॅनरचा बोलबाला कायम असून मुंबईच्या घटनेनंतरही नगर परिषदेने कुठलाच बोध घेतला नसल्याचे चित्र आहे.

### प्रशासकराज अडचणीत भर

**गेल्या दोन वर्षापासून गोंदिया नगर परिषदेचे निवडणूक झालेली नाही. त्यामुळे प्रशासकराज सुरु आहे. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कुणाचाही कचक नसून मनमर्जी कारभार सुरु आहे. प्रशासकराजमुळे अनेक महत्वपूर्ण निर्णय सुद्धा प्रलंबित आहेत. तर अनेक विकास कामे सुद्धा रखडल्याचे चित्र आहे.**

### प्रशासक करणार का कारवाई

**गोंदिया नगर परिषदेत प्रशासकराज असून अलीकडे नवे मुख्याधिकारी बल्हाळ हे रुजू झाले आहेत. ते शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यामुळे ते शहरातील अवैध होर्डिंग व बॅनगर हटविण्यासाठी रस्त्यावर उतरुन कारवाई करणार का असा सवाल शहरवासीयांकडून केला जात आहे.**

# वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पत्राला शिक्षण विभागाने दाखवली केराची टोपली

गोंदियाः- जिल्ह्यातील एका शिक्षण संस्थेतील गैरप्रकार, कर्मचाऱ्यांना त्रास देणे, त्यांचे जाणिवपुर्वक वेतन अडवून ठेवणे या संदर्भातील तक्रारीवर शासन आदेशित नियमाप्रमाणे कारवाई करून कारवाईचा अहवाल संबंधित कार्यालयास सादर करण्याचे निर्देश शिक्षण उपसंचालकांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी गत वर्षी डिसेंबर महिन्यात पाठविलेल्या पत्राद्वारे दिले होते.मात्र शिक्षण विभागाने अद्यापही या संदर्भात कोणतीही कारवाई केली नसल्याची माहिती आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पत्रालाच शिक्षण विभागाने केराची टोपली दाखविल्याची चर्चा जिल्ह्यातील शैक्षणिक वर्तुळात आहे.



ग्रामीण विकास संस्था चापटी/सुरगाव ता. अर्जुनी मोरगाव अंतर्गत परसटोला येथे केवळराम मेश्राम विद्यालय व खांबी/पिंपळगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय आहे. गैरअर्जदार संस्थेचे संचालक प्रतिभा मेश्राम, यशवंत मेश्राम, रत्नकुल मेश्राम, रत्नदीप मेश्राम, रामदास वैद्य आदींनी बनावट कागदपत्र व सह्या करून धर्मदाय आयुक्त, शिक्षण विभागाची व संस्थेची फ़सवणुक केली. संस्थेचे अध्यक्ष तथा तत्कालीन मुख्याध्यापक यशवंत मेश्राम हे कार्यरत असताना संस्थेची परवानगी न घेता त्यांनी नियमित बीएड केले आहे. या संबंधिची चौकशीची मागणी वामन मेश्राम, राजू मेश्राम, कल्पना बागडे यांनी केली आहे. गैरअर्जदार यांच्याविरोधात अर्जुनी मोर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची तक्रार धर्मदाय आयुक्त व शिक्षण उपसंचालक यांना केली आहे. त्या अनुषंगाने उपसंचालकांनी २० डिसेंबर २०२३ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना शासन आदेशित नियमाप्रमाणे कारवाई करून कारवाईचा अहवाल संबंधित कार्यालयास सादर करण्याचे निर्देश दिले होते मात्र अद्यापही शिक्षणाधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याने तक्रारकर्ते वामन मेश्राम, राजू मेश्राम, कल्पना मेश्राम यांनी सदर संस्थेच्या शाळांवर प्रशासक नेमण्याची मागणी केली आहे.

संस्था संचालकांचा आपसी वाद आहे. संस्थेचे प्रकरण धर्मदाय आयुक्तांकडे प्रविष्ठ आहे. त्यावर निर्णय होणे आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन अडवू नये, शाळा व्यवस्थापनाला पत्र पाठविले आहे. प्रशासक नेमण्यासाठी वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यावे लागेल आणि त्यानुसारच पुढील कारवाई होईल, असे माध्यमिकचे शिक्षणाधिकारी डॉ. महेंद्र गजभिये यांनी सांगितले.